मराठी दैनिक

RNI NO.MAHMAR/2007/21516

# तहलका समाचार

स्वागत मूल्य १ रुपया

संपादक : संतोष गोविंद कोठावदे

tehalkasamacharm@gmail.com

■ वर्ष : १८ ■ अंक : ३२६ मुंबई, रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ ■ पृष्ठ : ४ ■ किंमत : २ रुपये.

## थोडक्यात

### आमचा महाराष्ट्र आमच मतदान

मुंबई : प्रतिनिधी - नुकतेच केंद्रीय केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र दौरा केला. यावेळी त्यांनी केलेल्या निरीक्षणानंतर आज शनिवारी पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेमध्ये 'आमचं महाराष्ट्र, आमचं मतदान' असे टॅगलाईन असल्याचे सांगितले. तसेच, यावेळी त्यांनी तब्बल ११ राजकीय पक्षांसोबत चर्चा केली असल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे मुद्दे लक्ष घेतले असल्याचे स्पष्ट केले. तसेच, यावेळी दिवाळी आणि इतर उत्सव लक्षात घेता निवडणूक जाहीर करण्यात यावी अशी राजकीय नेत्यांची भूमिका त्यांच्या समोर मांडली.

केंद्रीय निवडणूक आयोग हे दोन दिवसीय महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या आहेत. राज्यातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी घेतला. यावेळी त्यांनी सर्व सरकारी संस्था आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. ते म्हणाले की, ₹मला विश्वास आहे, इतर उत्सवांप्रमाणे लोकशाहीच्या उत्सवातही सर्वजण आपले अमूल्य योगदान देतील. सर्व तरुण, महिला, राज्यातील सर्व नागरिक या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतील.₹ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### लोकअदालतमध्ये पुन्हा रचला नवा इतिहास

ठाणेः लोक न्यायालयात पुन्हा एकदा नवा इतिहास रचला गेला. टँकरच्या धडकेत मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना एका खाजगी इन्शुरन्स कंपनीकडून साडेचार कोटींची मदत मिळवून देण्यात ठाणे लोकन्यायालयाला यश आले. मोटार अपघात प्राधीकरणाकडे हे प्रकरण दाखल करण्यात आले होते. हा दावा शनिवारी मोटार अपघात प्राधीकरणाचे सदस्य, न्यायमूर्ती एस. एन. शाह यांच्या कोर्टात निकाली काढण्यात आला. गेल्यावर्षी एका प्रकरणात २ कोटी ८५ लाखांची मदत लोकन्यायालयाने मिळवून दिली होती.

# निवडणूक काळात ATM व्हॅनला निर्बंध, तक्रारीसाठी ॲप

## आयोगाने दिली महत्त्वाची माहिती

मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्या 2 दिवसांत राज्यातील राजकीय पक्ष व विविध संस्थांशी चर्चा करुन विधानसभा निवडणुकांसाठीचा आढावा घेतला आहे. त्यानंतर, आज पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांसाठीची महत्वाची माहिती दिली. राज्यातील मतदारांची संख्या, पुरुष, महिला, तृतीयपंथी मतदार आणि मतदारांमध्ये झालेल्या वाढीसंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार यांनी माहिती दिली. तसेच, निवडणूक काळात काही निर्बंध घालण्यात येणार असून एटीएमसाठी पैशांचा पुरवठा करणाऱ्या व्हॅनला वेळेचे बंधन असणार आहे. तसेच, याकाळात अँब्युलन्स, बँक आणि पतसंस्था यावर देखील लक्ष ठेवलं जाईल, असेही राजीव कुमार यांनी म्हटलं.

राज्यात एकूण 288 विधानसभा मतदारसंघांत निवडणूक होत आहे. त्यासाठी, राज्यात पुरुष मतदार 4. 95 कोटी आणि स्त्री मतदार 4.64 कोटी आहेत, थर्ड जेंडर म्हणजेच तृतीयपंथी मतदारांची संख्या 5997 असून राज्यातील दिव्यांग मतदार 6.32 लाख एवढे आहेत. यंदा पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या नवयुवकांची संख्या म्हणजे नव मतदार 19.48 लाख एवढे आहेत. राज्यांत महिला मतदारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून 10.77 लाख मतदार आहेत. राज्यांत एकूण पोलिंग स्टेशन 1 लाख 186 असणार आहेत.



### 3 वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करा

मुंबई : 3 वर्षांपेक्षा जास्त ज्या अधिकाऱ्यांची सेवा झाली त्यांना तात्काळ बदला असे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. पुढच्या दोन तीन दिवसांत बदल्या करा, असे आदेश दिले असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज निवडणूक आयोगाची महत्वाची पत्रकार परिषद आज पार पडली. यामध्ये निवडणुकीच्या संदर्भातील महत्वाची माहिती त्यांनी दिली. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुरुष मतदार हे 4.95 कोटी आहेत. तर स्त्री मतदार हे 4.64 कोटी आहेत. तसेच दिव्यांग 6.32 लाख आहेत. तर थर्ड जेंडर मतदार हे 5997 आहे. याचबरोबर पहिल्यांदा मतदान करणारे मतदार हे 19.48 लाख आहेत. जो सभेसाठी मैदान मिळण्यासाठी अर्ज करेल त्याला मैदान देण्याची संधी दिली जाईल. अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. दिवाळी आणि छट पूजा हे सण लक्षात घेऊन तारखा जाहीर कराव्यात अशी या पक्षांनी विनंती केल्याची माहिती निवडणूक आयोगानं केली आहे.

शहरातील मतदान बुथ केंद्रांची संख्या 42 हजार 585, तर ग्रामीण महाराष्ट्रात 57 हजार 601 मतदान बुथ केंद्र असणार आहेत. काही ठिकाणीं तरूण अधिकारी बूथ मॅनेज करतील. 350 असे बूथ असतील जिथे तरुण अधिकारी बूथ मॅनेज करतील.

लोकसभा निवडणुकीत कमी मतदान क्षेत्र असेलल्या कुलाबा, कल्याण, कुर्ला, मुंबादेवी इथ मतदान कमी झालं आहे. गडचिरोली येथे 73 टक्के मतदान झालं, मग कुलाबा कल्याण येथे मतदानाचा टक्का वाढायला हवा. इथल्या मतदारांनी विचार करायला हवा, असेही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

या ॲपवर तक्रार करता येणार

निवडणूक आयोगाच्यावतीने सुविधा पोर्टल नावाने ॲप जारी करण्यात आलं आहे. या एप्लिकेशन्सवर मतदारांना तक्रार करता येणार आहे. एखाद्या ठिकाणीं काही घटना घडली किंवा उशीरापर्यंत मतदान सुरु असेल तर केवळ फोटो काढून या एप्लिकेशन्सवर अपलोड केला की, 90 मिनिटांत निवडणुक आयोगाची टीम तिथं पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

एटीएमसाठी पैसै घेऊन जाणाऱ्या गाडीला निवडणुक काळात रात्री 6 ते सकाळीं 8 पर्यंत पैसे वाहतूक करता येणारं नाही. याकाळात अँब्युलन्स, बँक आणि पतसंस्थांवर देखील लक्ष ठेवलं जाईल.

# पुण्याचं वैशिष्ट्य विचारलं तर लोक सांगतात 'कोयता गँग'

## शरद पवारांचा राज्य सरकारवर निशाणा

पुणे : आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी काय केलं पुण्यामध्ये? मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो पार्लमेंटचा सभासद आहे म्हणून दिल्लीला जातो. महाराष्ट्राची वर्तमानपत्र मागून घेतो, टीव्ही लावतो काय बघायला मिळतं? पुण्याची चौकशी केली तर लोक सांगतात पुण्याचे वैशिष्ट्य काय? कोयता गँग. कोयता गँग विद्येचे माहेरघर हे पुणं. टेल्को सारखा कारखाना, या पुण्यात बजाज सारखा कारखाना हे पुण्याचे वैशिष्ट्य, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचे वैशिष्ट्य आणि आजच्या राज्यकर्त्यांनी पुण्याचे वैशिष्ट्य काय केले?₹ असा सवाल करत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी शुक्रवारी (दि.28)



पुण्याच्या खराडी येथील सभेत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी शरद पवार बोलत होते.

शरद पवार म्हणाले, कोयता गँग आता भाषणामध्ये कोणी सांगितलं जर अलीकडच्या काळामध्ये नवी पिढी काय करतात मला माहित नाही. कसल्या तरी गोळ्या असतात ते खाल्लं तर एकदम चंद्रावर जातो आणि ते चंद्रावर जाण्याचा उद्योग आज पुण्याच्या भागांमध्ये व्हायला लागला आहे. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्ज व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत.

> “ यामुळे पुणे आणि पुण्याची नवी पिढी ही उध्वस्त होणार या प्रकारचे चित्र या ठिकाणी दिसते. आज हा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे.पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, मध्यंतरी वाचलं एक आमदार अशा कामांमध्ये वेगळ्या पद्धतीने लोकांना मदत करतो. आता मी येताना बघितलं मोठे मोठे बोर्ड होते. आमचा दमदार आमदार काय दमदार आहे? चौकशी केली की हा आमदार दमदार आहे म्हणून काय भानगड काय? नाव काय त्याचं? टिंगरे. अरे बाबा तू सांगतो तू कुणाच्या तिकिटावर निवडून आला? त्या वेळेला तुझ्या पक्षाचा नेता कोण होता? त्या वेळेला हा पक्ष कोणी काढला? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही कोणी केली? सबंध हिंदुस्थानला माहित आहे त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली काम करावं अशी अपेक्षा केली.

# बच्चू कडूंच्या प्रहार पक्षाचा पहिला उमेदवार जाहीर

## भावी मुख्यमंत्री तिसऱ्या आघाडीशिवाय ठरणार नसल्याचाही विश्वास

वर्धा : आमचे दहा जरी आमदार निवडून आले तर आम्ही गणपती बसविल्याशिवाय राहणार नाही, असा टोला लगावत महाराष्ट्रात भावी मुख्यमंत्री तिसऱ्या आघाडीशिवाय ठरणार नसल्याचे संकेत आमदार बच्चू कडूंनीही यांनी दिले आहे. याचवेळी उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यावर सडकून टीका करत बच्चू कडू यांनी जोरदार हल्ला चढवला आहे. विशेष म्हणजे वर्ध्याच्या कारंजा घाडगे येथे प्रहार पक्षाच्या सभेत राज्यातील प्रहरचा



पहिला उमेदवारही बच्चू कडू यांनी स्टेजवरून घोषीत केला आहे. बीआरएस मधून प्रहारमध्ये प्रवेश केलेल्या जयकुमार बेळखडे यांच्या नावाची आर्वी विधानसभेवर प्रहारचा उमेदवार म्हणून नाव घोषित करण्यात आले आहे.लोकसभा निवडणुकीनंतर आता साऱ्यांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहे.

> “ त्याच पार्श्वभूमीवर जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, राज्यात आणखी एका आघाडीची शक्यता वर्तवली जात असताना महाराष्ट्रात प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू, स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे ,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी निर्माण केलेल्या तिसऱ्या आघाडीकडून नेमक्या किती जागा लढविल्या जातात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यात आता वर्ध्यातील चारही विधानसभा मतदारसंघात तिसऱ्या आघाडीच्या महाशक्तीने लढण्याची तयारी सुरु केल्याचे दिसून आले आहे. तर त्यातच आज वर्ध्याच्या कारंजा घाडगे येथे प्रहार पक्षाच्या सभेत राज्यातील प्रहरचा पहिला उमेदवारही बच्चू कडू यांनी स्टेजवरून घोषीत केला आहे. बीआरएस मधून प्रहारमध्ये प्रवेश केलेल्या जयकुमार बेळखडे यांच्या नावाची आर्वी विधानसभेवर प्रहारचा उमेदवार म्हणून नाव घोषित करण्यात आले आहे.

# पूर्व विदर्भातल्या 28 पैकी 14 जागांवर शिवसेना ठाकरे गटाचा दावा

## उद्धव ठाकरेंचे मिशन विदर्भ?

नागपूर : गेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला विदर्भात मोठे यश आल्याचे बघायला मिळाले आहे. एकट्या विदर्भातील 10 पैकी 7 ठिकाणी महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवत पुन्हा घरवापसी केली आहे. तर आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये विदर्भात भाजपचा (BJP) ग्राफ सतत खाली येत असल्याचे चित्र आहे. 2014 मध्ये विधानसभेत 44 जागा तर 2019 मध्ये 29 जागा भाजपने जिंकल्या होत्या. त्यामुळे आता 2024 मध्ये विदर्भातून भाजपच्या आधिक जागा वाढवण्यासाठी अमित शाह पक्षाच्या रणनीतीचा आढावा घेण्यासाठी नुकतेच येऊन गेले आहेत.

त्याच अनुषंगाने आगामी विधानसभा निवडणुकीतही महायुतीकडून वेगळी रणनीती आखली जात असताना आता शिवसेना ठाकरे गटानेही विदर्भात आपली ताकद आजमावल्याचे चित्र आहे. किंबहुना पूर्व विदर्भातील 28 पैकी 14 जागांवर शिवसेना ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे.

उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव हे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. नुकताच त्यांनी पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतलीय.

# हा नवा भारत, घरात घुसून मारतो, आजच्याच रात्री सर्जिकल स्ट्राईक : मोदींचा काँग्रेसवर घणाघात

जम्मू : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मूमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना शहीद भगतसिंग यांना आदरांजली वाहिली. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी ही शेवटची सभा असल्याचं म्हटलं आहे. मोदी म्हणाले की, ₹गेल्या आठवड्यात त्यांना जम्मू आणि काश्मीरच्या विविध भागांना भेट देण्याची संधी मिळाली आणि ते जिथेही गेले तिथे त्यांना भाजपाचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.₹

नरेंद्र मोदींनी काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीवर जोरदार निशाणा साधला आहे. ₹जम्मू-काश्मीरमधील लोक या तीन घराण्यांच्या राजकारणाला कंटाळले आहेत. येथील लोकांना आता दहशतवाद, फुटीरतावाद आणि रक्तपात नको आहे. त्यांना त्यांच्या मुलांचं चांगले भविष्य आणि



शांतता हवी आहे. त्यामुळेच लोक भाजपा सरकारला पाठिंबा देत आहेत. जम्मू-काश्मीरमधील लोकांचा मूड भाजपाच्या बाजूने असल्याचं स्पष्ट झालं आहे₹ असं म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईकची आठवण करून दिली. ₹आजच्याच रात्री सर्जिकल स्ट्राईक झाला.

# ठाकरे गटाला महाविकास आघाडीत फक्त ४४ जागा मिळतील : प्रकाश आंबेडकरांचा मोठा दावा

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांच्या तयारीला, बैठकांना, चर्चांना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे-प्रतिदावे, आरोप-प्रत्यारोप सुरू असून, आता तिसऱ्या आघाडीचा पर्याय राज्यातील जनतेसमोर येणार आहे. संभाजीराजे छत्रपती, बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांनी एकत्रित येत परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी उघडली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर या तिसऱ्या आघाडीत सामील होऊ शकतात, अशा चर्चा आहेत. यातच ठाकरे गटाला महाविकास आघाडीत ४४ जागा मिळतील, असा मोठा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.



प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकारांशी बोलताना याबाबत दावा केला. विधानसभा निवडणुकीच्या जागांसाठी काँग्रेस असे ठरवत आहे की, १५० जागांच्या खाली यायचे नाही. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांनी असे ठरवले आहे की, ८८ जागांच्या खाली यायचे नाही. त्यामुळे आपण जर या दोन्ही पक्षाच्या जागांच्या मागणीचा विचार केला तर शिवसेना ठाकरे गटाला महाविकास आघाडीत फक्त ४४ जागा मिळतील. एवढ्या जागा ठाकरे गटाला सोडायला ते तयार असल्याची परिस्थिती आहे. आता हा फॉर्म्युला समोर येत असल्यामुळे यावरून आणखी राजकारण होईल. काही ओबीसींच्या नेत्यांनी सांगितले की, सर्वांत मोठा पेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसमोर असणार आहे, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला.

आगामी विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी शिवसेना ठाकरे गटाबरोबर जाणार का? असा प्रश्न प्रकाश आंबेडकर यांना करण्यात आला. आम्ही कोणाबरोबर जाणार आहोत, हे आम्ही सांगितले आहे. आदिवासींचे संघटन होत आहे, त्यांच्याबरोबर वंचित बहुजन आघाडी जात आहे.



दिवा स्थानक पुर्व येथील १५० मी. अंतरावर असलेल्या हातगाड्या व फेरीवाल्यांवर ठाणे महानगरपालिकेचे दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली.

# धर्मवीर २ वरुन दिघे शिरसाट मध्ये जुंपली

मुंबई : दिवंगत शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गुरुस्थानी असलेल्या आनंद दिघे यांच्या जीवनपटाचा भाग २ म्हणजेच धर्मवीर २ साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट हा बहुचर्चित सिनेमा काल शुक्रवारी सप्टेंबर रोजी प्रदर्शित झाला.

अपेक्षेप्रमाणे शिवसेना शिंदे गटाकडून या चित्रपटाचे स्क्रिनींग अनेक ठिकाणी मोफत करण्यात आले. तर, शिंदेंच्या शिवसैनिकांनी चित्रपटावर चर्चाही सुरू केली आहे. मात्र, ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर हा चित्रपट प्रदर्शित करत शिंदें शिवसेनेकडून राजकीय नेरेटीव्ह पसरवला जात असल्याचा आरोप केला जात आहे. तर, आनंद दिघेंना बाळासाहेब ठाकरेंपेक्षा मोठं करण्याचा प्रयत्न होत आहे, अशी थेट टीका संजय राऊत यांनी केली असताना आता, धर्मवीर २ सिनेमावरुन शिंदें शिवसेना प्रवक्ते आमदार संजय शिरसाट आणि आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांच्यात जुंपल्याचं दिसून आले.

धर्मवीर २ सिनेमाबाबत बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, चित्रपट पाहताना घटनाक्रम पाहायला हवा. काही लोकांना असं वाटत की शिवसेना त्यांच्या पासून जन्मली, पण असे नाही ती बाळासाहेबांनी बनवली. दिघे साहेब यांनी जे घडवले त्यावर पाणी फिरण्याचे काम करतात. आनंद दिघे हे एकनाथ शिंदे यांच्या स्वप्नात आल्याचे दाखवले तर त्याला वेगळा संदर्भ लावू नका, असे शिरसाट यांनी म्हटलं आहे. त्यांच्या अकलेचा कमीपणा दिसतो. दिघे साहेब ठाण्यापासून मातोश्रीवर जायचे तो काळ तसा होता. आता मातोश्रीवर गेल्यावर अस समजते की हे लोक सिल्व्हर ओकवर असतात, आम्हाला तिकडे जायचं नव्हतं म्हणून आम्ही गुवाहाटीला गेलो, असेही शिरसाट यांनी म्हटले. तसेच, आनंद दिघे यांना मारलं गेलं, अख्खा ठाणे जिल्हा जाणतो की त्यांचा घातपात झालाय, असा गंभीर आरोपही संजय शिरसाट यांनी केला आहे. आता, शिरसाट यांच्या आरोपावर आनंद दिघेंचे दुसरे शिष्य आणि ठाण्यातील ठाकरे शिवसेना गटाचे नेते माजी खासदार राजन विचारे यांनी यावर पलटवार केला आहे.

धर्मवीर एक असो किंवा धर्मवीर दोन असो हा चित्रपट बनवणारी सगळी मंडळी ही गोंधळलेला अवस्थेत दिसतात. स्वतःची प्रतिमा कशी सांभाळावी आणि आपण केलेली गद्दारी हे आपण लोकांसमोर चांगल्या पद्धतीने मांडून आपली प्रतिमा सांभाळण्याचं काम किंवा हा केविलवाणा प्रयत्न करतानाही मंडळी दिसतात.

## पाहिजेत

दैनिक तहलका समाचार या नामांकित वृत्तपत्रास १ डीटीपी ऑपरेटर पाहिजे.

आकर्षक पगार दिला जाईल.

इच्छूकांनी आपला बायोडाटा tehalkasamacharm@gmail.com या ईमेलवर पाठवावा. किंवा ९८६७०२४६२४ या क्रमांकावर हॉटस्अ‍ॅप करावा.

-व्यवस्थापक

# श्रीलंकेतील बदल

भारताचा एक महत्त्वाचा शेजारी असलेल्या श्रीलंकेच्या राष्ट्रपतिपदी डाव्या विचारसरणीच्या अनुरा कुमारा दिसनायके यांची नियुक्ती झाल्यामुळे उपखंडातील राजकारणावर त्याचा निश्चितच परिणाम होणार आहे. ज्याप्रकारे दिसनायके यांच्या पक्षाने श्रीलंकेतील आतापर्यंतच्या पारंपरिक पक्षांना बाजूला सारून डाव्या विचारसरणीच्या आपल्या पक्षाला राष्ट्रपतिपदावर बसवले आहे ते पाहता श्रीलंकेतील जनतेलाही अशा प्रकारचा बदल हवा आहे हे दिसून येते. या सर्व घडामोडी घडत असताना भारतासाठी त्या किती महत्त्वाच्या आहेत याचाही विचार करावा लागणार आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष दिसनायके ज्या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात तो जनता विमुक्त पेरामुना हा राजकीय पक्ष दीर्घकाळापासून डाव्या विचारसरणीकडे झुकलेला आहे. अर्थात, गेल्या चार-पाच वर्षांच्या कालावधीमध्ये दिसनायके यांच्याकडे या पक्षाचे नेतृत्व गेल्यावर त्यांनी काही प्रमाणात लिबरल होण्यास प्रारंभ केला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर लक्ष ठेवून त्यात सुधारणा करण्याकडे त्यांनी प्राधान्य दिले असले, तरी देशातील अर्थतज्ज्ञांना मात्र देशाची प्रगती आणि डाव्या विचारसरणीच्या नेत्याच्या हातात सत्ता हा विरोधाभास असल्याचे वाटत आहे, हेसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचे आहे.

श्रीलंकेमध्ये 2022 मध्ये ज्या प्रकारे जनतेने उठाव करून तत्कालीन राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांना देशाबाहेर हाकलून दिले होते त्यानंतर देशातील परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला होता. देशातील तरुणांना आणि इतरांनासुद्धा आता देशामध्ये बदल हवा अशी जाणीव झाली होती. त्याचेच प्रतिबिंब या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये उमटले आहे. कारण, या निवडणुकीमध्ये विजयी अध्यक्ष दिसनायके यांनी विद्यमान राष्ट्राध्यक्ष रानील विक्रमसिंगे यांचा पराभव केलाच. शिवाय गोटाबाया यांच्या पक्षातील नानल राजपक्षे यांचासुद्धा या निवडणुकीमध्ये पराभव केला. म्हणजेच गेली अनेक वर्षे श्रीलंकेतील राजकारण ज्या दोन गटांमध्ये घुटमळत होते त्यातून या राजकारणाला बाहेर काढून श्रीलंकेतील नागरिकांनी एक तिसरा पर्याय निवडल्याचे दिसते. हा डाव्या विचारसरणीचा पर्याय लोकशाहीमध्ये परिणामकारक ठरू शकतो आणि कदाचित श्रीलंकेलासुद्धा फायदेशीर ठरू शकतो.

गेल्या काही वर्षांमध्ये दिसनायके यांनी आपली डावी विचारसरणी काही प्रमाणात मवाळ केली आहे. पण मुळात त्यांचे धोरण चीनधार्जिणे असल्याचेही मानले जाते. त्यामुळे भारतासाठीसुद्धा श्रीलंकेतील हा बदल महत्त्वाचा मानावा लागणार आहे. भारताचे जे प्रमुख शेजारी देश आहेत त्यापैकी बांगलादेश, पाकिस्तान आणि आता श्रीलंका या सर्व देशांमध्ये जर चीनचे वर्चस्व वाढू लागले, तर त्याचा भविष्यात भारताला तोटा होणार आहे हे उघड आहे. अर्थात, सध्याच्या परिस्थितीमध्ये श्रीलंकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष थेटपणे चीनची बाजू घेतील अशी शक्यता नाही. कारण 2022 मध्ये जेव्हा श्रीलंकेला मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची गरज होती तेव्हा भारतानेच ती मदत केली होती आणि श्रीलंकेची अर्थव्यवस्था सावरली होती. याची जाणीव त्यांनाही आहे आणि त्याबाबत भारताचे आभारही मानले आहेत. पण श्रीलंकेच्या अंतर्गत बाबीमध्ये भारतासह कुठल्याही देशाने लक्ष घालू नये हा मात्र त्यांचा आग्रह असणार आहे. ज्या प्रकारे श्रीलंकेतील तामिळी चळवळीला भारताचा पाठिंबा असल्याचे आरोप आतापर्यंत केले जात होते ते पाहता आणि नवनिर्वाचित अध्यक्षांची तामिळी चळवळीबाबत असलेली कठोर भूमिका पाहता हा एक विषय मात्र भारत आणि श्रीलंका यांच्यातील वादाचा मुद्दा भविष्यात बनू शकतो. तामिळींनी स्वतंत्र राष्ट्राची मागणी करून देशामध्ये संघर्ष करू नये अशा प्रकारची भूमिका दिसनायके यांच्या पक्षाने पूर्वीपासून घेतली असल्याने आणि श्रीलंकेतील तामिळी चळवळीला भारताने पाठिंबा देऊ नये असे स्पष्टपणे बजावले असल्याने हाच एक विषय महत्त्वाचा ठरणार आहे.

अर्थात, गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये श्रीलंकेच्या राजकारणामध्ये पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचे काम दिसनायके यांनी केले असले तरी त्यांच्यासमोर अशी अनेक आव्हाने आहेत म्हणूनच भारत आणि चीन यांच्याशी संबंध जपताना त्यांना योग्य समतोल साधावा लागणार आहे. सांस्कृतिकदृष्ट्या आणि व्यावहारिकदृष्ट्या सुद्धा श्रीलंकेला चीनपेक्षा भारताची मैत्री जास्त फायदेशीर ठरणार आहे याची कबुली श्रीलंकेतील यापूर्वीच्या राज्यकर्त्यांनी आणि श्रीलंकेतील तज्ज्ञांनीही दिली आहे. ही निवडणूक होण्यापूर्वी दिसनायके भारताच्या दौर्‍यावर आले होते आणि त्यांनी प्रमुख नेत्यांशी चर्चा केली होती. साहजिकच केवळ मार्क्सवादी विचारसरणीशी बांधिलकी आहे म्हणून ते लगेच भारताशी मैत्री झटकतील आणि चीनचा हात पकडतील असेही नाही. अध्यक्षपद हे एक मोठे आव्हान आहे याची कल्पना त्यांना आहे त्यामुळे एका रात्रीत सर्व बदल त्यांनाही अपेक्षित नाहीत.

सध्या तरी श्रीलंकेतील सत्तेत बदल झाला आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. या बदलाचे परिणाम त्या देशामध्ये काय होतात आणि शेजारी असलेल्या भारतासारख्या देशावर काय होतात हेच पाहणे आगामी कालावधीमध्ये औत्सुक्याचे ठरणार आहे. श्रीलंकेतील जनतेने लोकशाही मार्गाचा वापर करून बदल घडवून एक सक्षम पर्याय समोर आणला आहे हे सध्या सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. दोन वर्षांपूर्वीच्या अराजकानंतर श्रीलंका लोकशाही मार्गाने सावरते आहे हेच खूप विशेष आहे.

# रुग्णांना तारक, डॉक्टरांना पूरक

जगात काही ठिकाणी अशा किरकोळ औषध विक्रेत्यांना 'कम्युनिटी फार्मसिस्ट' असेही संबोधले जाते. कम्युनिटी फार्मसिस्ट हा त्या व्यवसायाचा समाजाभिमुख चेहरा असतो. औषध खरेदी-विक्री, साठवण, कालबाह्य झालेला माल काढून टाकणे, रुग्णास औषधे देणे, रेकॉर्ड्स ठेवणे, अकाउंट्स, जीएसटी अशी अनेक कामे त्यांना करावी लागतात. स्वतःचे दुकान आणि त्यात एकच फार्मसिस्ट असल्यास त्यालाच बॅक ऑफिस सांभाळावे लागते. तोच सीईओ, सीएफओ, सीओओ असतो. साहाय्यक स्टाफ असला, तरीही सर्व व्यवस्थापन आणि जबाबदारी त्या एकाच फार्मसिस्टवर येते. त्यामुळे सकाळपासून रात्री उशिरापर्यंत फार्मसिस्ट दुकानातच अडकून पडतो. साहजिकच सणवार, छंद, सुट्ट्या वगैरे चैन त्यांना परवडत नाही. आणखी एखादा फार्मसिस्ट नेमल्यास यापैकी काही करता येईलही, मात्र सहसा हे त्यांना परवडणारे नसते.

अशा छोट्या दुकानदारांचा व्यवसाय काही वर्षांपूर्वीपर्यंत बरा चालत असे. त्यांना कामाचे समाधानही मिळत असे, पण आता परिस्थिती वेगळी आहे. फार्मसिस्टमध्ये अस्वस्थता दिसते. दुकानांची संख्या प्रचंड वाढली आहे. साहजिकच त्यांच्यातील चढाओढही वाढत आहे. त्यातच अनेक रुग्ण सवलती मिळविण्यासाठी औषधांची खरेदी ऑनलाइन करतात आणि औषध दुकानांकडे पाठ फिरवितात. (त्यात अद्याप इंटरनेट फार्मसीविषयी सुस्पष्ट कायदे करण्यात आलेले नाहीत.) मात्र आणीबाणीच्या वेळी रात्री-बेरात्री कोपऱ्यावरील दुकानदाराकडेच धाव घेतात आणि तोही दुकान उघडून औषधे देतो. गेल्या काही वर्षांत अनेक जेनेरिक दुकाने सुरू झाली. कॉर्पोरेट फार्मसी चेन शॉप्सही वाढत आहेत आणि डिस्काउंट, स्वस्त ब्रँड्सचा पर्याय हा तिथेही एक आकर्षक मुद्दा आहे. लहान औषध दुकानांतही जेनेरिक पर्याय उपलब्ध असतातच की. पण औषध कायद्यानुसार 'डॉक्टरांनी जे लिहिले तेच' दिले जाणे अपेक्षित असते. म्हणून नियमांना धरून चालणारे फार्मसिस्ट 'ब्रँड सबस्टिट्युशन' करत नाहीत.

आणखी एक बाब म्हणजे डिस्पेन्सिंग डॉक्टर्स. जुन्या (१९४० च्या) कायद्यातील 'शेड्युल के'च्या आधारे विविध पॅथींचे काही (सर्व डॉक्टर्स स्टॉक करत नाहीत) डॉक्टर्स औषधाच्या स्ट्रिप्सच्या स्ट्रिप्स, लोशन्स, क्रीम्स, टॉनिक्स असा सरसकट भरपूर स्टॉक ठेवतात आणि रुग्णांना तिथूनच देतात. ते रुग्णहित आणि रुग्णसुरक्षेसाठी योग्य आहे का? १९४० च्या काळाचा विचार करता 'शेड्युल के' ही तरतूद योग्यच, पण आता सर्व औषधे पॅक होऊन येतात. गल्लीबोळांत दवाखान्यांच्या बाजूलाच औषधांची दुकाने आहेत. आजच्या काळात दवाखान्यांत औषधांचा स्टॉक ठेवण्याची गरज आहे का? आणि ठेवला तरी किती, कोणती अत्यावश्यक औषधे हा कळीचा मुद्दा. याबाबत 'शेड्युल के' मध्ये सुस्पष्टता नाही. 'शेड्युल के'च्या सर्व शर्ती पाळल्या जातात का हे कितपत बारकाईने पाहिले जाते? कालबाह्य 'शेड्युल के'मध्ये दुरुस्ती नको? डिस्पेन्सिंग डॉक्टर्स इतरही काही देशांत आहेत. मलेशियातील पाहणीनुसार औषधे लिहून देणाऱ्या (स्टॉक न करणाऱ्या) डॉक्टर्सपेक्षा सातपट जास्त औषधे डिस्पेन्सिंग डॉक्टर्स देतात, झिम्बाब्वेमध्ये हेच प्रमाण दुप्पट दिसले. म्हणजेच स्वतः औषधे देताना गरजेपेक्षा अधिक अतार्किक, वापर होतो का? भारतात असे काही अभ्यास झाल्याचे ऐकिवात नाही.

**फार्मसिस्ट म्हणजे कोण? डी. फार्म, बी. फार्म किंवा फार्म डी. किंवा त्यातील पदव्युत्तर शिक्षण घेतलेली व्यक्ती. अशा व्यक्ती नोंदणीकृत फार्मसिस्ट होऊ शकतात. त्यांना स्वतःचे औषध दुकान सुरू करता येते किंवा रुग्णालय, फार्मा कंपनी, औषध नियंत्रण, क्लिनिकल ट्रायल्स अशा अनेक क्षेत्रांत संधी मिळू शकते. त्यापैकी औषध दुकानदारांविषयी जाणून घेऊया.**

बहुतांश फार्मसिस्ट कामातील नीतिमत्तेला सर्वोच्च प्राधान्य देतात. रुग्णाची सुरक्षा केंद्रस्थानी असावी, अशी त्यांची मनोधारणा असते. ते पूर्णवेळ त्यांच्या दुकानात थांबतात. झोपेच्या गोळ्या, अँटिबायोटिक्स किंवा तत्सम औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय देत नाहीत. त्यांच्या परिसरातील डॉक्टर्सही त्यांचा आदर करतात. पण काही दुकानांत फार्मसिस्ट हजर नसतात. प्रिस्क्रिप्शनशिवायही औषधे दिली जातात आणि त्यांच्यामुळे सारेच फार्मसिस्ट्स बदनाम होतात, हे वास्तव अन्यायकारक आहे. सुक्याबरोबर ओलेही जळतेच. कायद्याची कडक अंमलबजावणी नको का? आणखी एक चिंतेची बाब- म्हणजे नावापुरती पदवी वा पदविका घेतलेले फार्मसिस्ट. त्यांनी प्रामाणिकपणे महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले नसते. महाविद्यालयात केवळ प्रवेश घेतात पण उपस्थित राहत नाहीत. बोगस फार्मासिस्टचे प्रमाण वाढत आहे की काय, अशी शंका येते.

बदलत्या काळानुसार व्यवसायातील स्पर्धा वाढणार आहेच आणि त्यात टिकून राहायचे तर चांगल्या सेवा देऊन रुग्णांशी नाते अधिक सशक्त करावे लागणार आहे, हे फार्मसिस्ट जाणून आहेत आणि त्यांना यासाठी अनुकूल वातावरण हवे आहे. परदेशांत फार्मसिस्ट डॉक्टर्स आणि रुग्ण यांतील दुवा म्हणून काम करतात. आपल्याकडेही फार्मसिस्ट रुग्णमित्र झाले, तर सामाजिक आरोग्य लक्षणीयरीत्या उंचावेल. भारतातही अनेक फार्मसिस्ट स्वतःहून रुग्णांचा रक्तदाब, रक्तातील शर्करेचे प्रमाण तपासून देतात. औषधे कशी घ्यायची हे समजावून सांगतात. इन्हेलर, इन्सुलिन पेनचा वापर शिकवतात, क्षयरोगसाठीची शासनाची डॉट्सची मोफत औषधे ठेवतो. औषधाचा डोस चुकवू नये म्हणून काही रुग्णांना 'रिमाइंडर मेसेजेस' पाठवात. वृद्ध रुग्णांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी विनंती केल्यास त्यांची आठवडाभराची औषधे कप्पे असलेल्या औषधांच्या बॉक्समध्ये भरून देतात, ज्यायोगे त्यांचा गोंधळ न होता औषधांचे वेळापत्रक नीट पाळले जाते.

परदेशात 'वार्धक्यस्नेही फार्मसी' ची संकल्पना रुजत आहे. भारतातही तसे बदल करणे आवश्यक आहे. जगातील ५५ देशांतील कम्युनिटी फार्मसीमधून रुग्णांना फार्मसिस्ट लसटोचणी करतात, व्यसनमुक्तीसाठी मार्गदर्शन करतात. भारतातही अनेक फार्मसिस्ट अशा सेवा देण्यास उत्सुक असू शकतात. एखादा उजळणी पाठ्यक्रम किंवा एखादी परिषदही त्यांना प्रेरणा देऊन जाते. मात्र उत्साह टिकावा यासाठी पोषक वातावरणाचा अभाव आहे. रुग्णांनाही अशा सेवांचे मोल असते की नाही कोण जाणे. 'सेवे'पेक्षा 'सूट' किती यावरच त्यांचा भर असतो. मग फार्मसिस्ट अधिक धडपड न करता हिरमुसला होऊन आपला फक्त दुकानदार बनून राहतो.

इंग्लंड, आयर्लंड, अगदी इजिप्त, थायलंडसारख्या देशांतही शासनानेच फार्मसीचे महत्त्व ओळखून सोयीची विनाविलंब सेवा मिळावी यासाठी रुग्णांनी सर्वसामान्य तक्रारींसाठी फार्मसीचा आधार घ्यावा असे आवाहन केले आहे. रुग्णांना तारक आणि डॉक्टर्सना पूरक अशी ही व्यवस्था प्राथमिक आरोग्य सेवेचा भक्कम पाया बनत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकास ध्येय तीन (उत्तम आरोग्य आणि कल्याण) गाठण्यासाठीच्या प्रगतीचे जे मानक दिले आहेत त्यापैकी एक फार्मसिस्टची घनता हे आहे. आरोग्यक्षेत्रासाठी ज्या चार मुख्य स्तंभांचा उल्लेख केला आहे ते आहेत डॉक्टर, परिचारिका, दंतवैद्याक आणि फार्मसिस्ट्स आहेत. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना, जागतिक आरोग्य संघटना यांनी तर पूर्वीच फार्मसिस्टना आरोग्य व्यावसायिक म्हटले आहे. ओईसीडीने शिफारस केली आहे की फार्मसिस्टच्या कामाच्या कक्षा वाढवून त्यांना अधिक व्यापक भूमिका दिली तर आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी होईल, यामुळे देशाला आर्थिक बचतही होते. तर असे हे फार्मसिस्टचे माहात्म्य आणि महत्त्व जागतिक स्तरावर आहे.

दुकानदार ते रुग्णस्नेही आरोग्य व्यावसायिक असे परिवर्तन होणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, कायदे अंमलबजावणी या साऱ्या आघाड्यांवर काम करावे लागेल. फार्मसिस्ट या आरोग्य साखळीतील निसटलेल्या कडीला आरोग्यव्यवस्थेच्या मुख्य साखळीत गुंफणे आवश्यक आहे. आरोग्यसेवा समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचा सहभाग वृद्धिंगत करणे गरजेचे आहे. फार्मसिस्टना बळ दिले तर प्राथमिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होईल. जागतिक फार्मसिस्ट दिवसानिमित्त हा संकल्प करणे महत्त्वाचे आहे.

# व्यापारीकरणानंतर तरी एसटीचे भले व्हावे!

राज्य मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा घेतला आहे. सुमारे आठ हजार कोटींचा तोटा असलेल्या एसटी मंडळाला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनापुढे हात पसरावे लागतात एवढी गंभीर परिस्थिती या मंडळाची आहे. तोटा भरून काढण्याबरोबरच एसटी मंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता मंडळाच्या मालमत्तेचे खासगीकरण करून निधी जमा करण्याची गेली अनेक वर्षे योजना आहे. एसटी मंडळाकडे ७५०च्या आसपास बस स्थानके आणि आगारांच्या जागा आहेत. व्यापारी तत्त्वावर एसटीच्या जागेचा विकास करण्याचा हा मंत्रिमंडळाने पहिल्यांदा घेतलेला निर्णय नाही. याची सुरुवात २००१ मध्ये झाली होती. पण गेल्या २३ वर्षांत त्यात फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २००६ मध्ये पुन्हा धोरणात काही बदल करण्यात आले. मध्यंतरी मंडळाच्या जागांचे चलनीकरण (मॉनेटायझेशन) करून निधी उभारण्याची योजना होती. पण याही प्रस्तावाची फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २०१७ मध्ये तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सर्वाधिक वर्दळीच्या १३ आगारांचा खासगीकरणातून विकास करण्याचा निर्णय घेतला, त्याचाही प्रभाव दिसलेला नाही. उलट पनवेल आगाराच्या विकासाची योजना रखडली. २०१९च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुंबई सेंट्रल येथील मंडळाच्या मुख्यालयाचा विकास करण्याच्या कामाचे भूमिपूजन पार पडले होते. ४९ मजली इमारत उभारण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. विविध सरकारी कार्यालये या इमारतीत सुरू करण्याची योजना होती. पण गेल्या पाच वर्षांत बांधकामाची एक वीटही हलली नाही. पाच वर्षांनी पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर व्यापारीकरणाचा घाट घालण्यात आला आहे. गेल्या दोन दशकांत एसटीच्या ४५ जागांचा व्यापारी तत्त्वावर विकास करण्यात आला. त्यातून एसटी महामंडळास अधिमूल्य स्वरूपात फक्त ३२ कोटी रुपये मिळाले. २२ कोटी मूल्याचे बांधकाम करून मिळाले. खासगीकरणातून विकास झाला त्या स्थानकांची अवस्था फार काही चांगली नाही. अगदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात खोपट आगाराचे काही वर्षांपूर्वी व्यापारीकरण करण्यात आले. ठेकेदाराने विक्रीसाठी अद्यायावत इमारत उभारली, पण एसटी स्थानकाच्या जागेची दुरवस्था कायम आहे. एसटी स्थानकांची देखभाल आणि दुरुस्ती होत नाही. परिणामी अनेक स्थानकांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य आहे. निधीची चणचण या 'विकासा'नंतरही कायम असल्याने एसटी मंडळाचे हात बांधले गेलेले आहेत.

व्यापारीकरणाचा नव्याने निर्णय घेताना काही अटी व शर्ती शिथिल करण्यात आल्या आहेत. भाडेपट्ट्याचा कालावधी ३० वर्षांवरून ६० वर्षे करण्याबरोबरच एसटी मंडळाच्या भूखंडावर उपलब्ध होणाऱ्या एकूण चटईक्षेत्र निर्देशांकापैकी ०.५ टक्के वगळता उर्वरित सर्व चटईक्षेत्र ठेकेदाराला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जमिनीचा व्यापारी तत्त्वावर उपयोग करताना ५० टक्के हिस्सा शासनाकडे भरण्यापासून महामंडळास सवलत देण्यात येईल. सर्व निविदा महामंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात येतील. यामुळे शासनाकडे होणारा फायलींचा प्रवास टळू शकेल. व्यापारीकरणात खासगी विकासकांनी भाग घ्यावा म्हणून अटी बदलल्यावर तरी व्यापारीकरणातून लाभ खरोखरच मिळतो का, हे आता बघायचे. व्यापारीकरणात खासगी विकासक स्वतःचा फायदा करून घेतात आणि शासनाला त्याचा फारसा लाभ मिळत नाही, हे अनेक विभागांमध्ये अनुभवास आले आहे. निविदा अंतिम करताना प्रवाशांच्या सोयीसुविधा तसेच आगारांमध्ये आमूलाग्र बदल होतील याची खबरदारी एसटी मंडळाला घ्यावी लागणार आहे.

राज्यातील सामान्य जनतेची 'लाल परी' तोट्यातून बाहेर आणण्याचे खरे आव्हान आहे. जवळपास दहा वर्षांनंतर ऑगस्ट महिन्यात एसटी मंडळाला तब्बल १६ कोटींचा फायदा झाला. एसटी मंडळाला तेवढाच दिलासा मिळाला. एसटीच्या ताफ्यात नवीन बस गाड्यांची भर घालण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देऊन सर्वसामान्यांची ही सेवा अधिक लोकाभिमुख करण्याच्या एसटीच्या अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचे स्वागतच. खासगी सेवेशी स्पर्धा करणाऱ्या एसटीच्या सेवेचा जास्तीत जास्त लोकांना फायदा झाला पाहिजे. पण गेल्या काही दिवसांपासून एसटी सेवेचे आपणच 'मालक' आहोत अशा आविर्भावात 'सदा' वावरणाऱ्या दाम्पत्याकडे या सेवेची सूत्रे जाऊन बट्ट्याबोळ होऊ नये एवढीच अपेक्षा. व्यापारीकरणातून एसटीला निधी मिळेल आणि त्याचा प्रवाशांना फायदा होईल या दृष्टीने प्रयत्न होणे अधिक आवश्यक आहे. अन्यथा ठेकेदारांनी बक्कळ फायदा कमवायचा आणि आगारे खड्ड्यातच हे चित्र कायम राहू शकते.

# व्याजदरकपातीचे परिणाम

भारताच्या विकासदराबद्दलचे चालू आर्थिक वर्षासाठीचे अनुमान 'एसएनपी ग्लोबल रेटिंग'ने 6.4 टक्क्यांवर कायम राखले आहे. मात्र, पुढील वर्षी विकासदर 6.9 टक्क्यांवर जाईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याचा अर्थ, भविष्य उज्ज्वल आहे, परंतु विद्यमान आर्थिक वर्षात मध्यवर्ती बँकेसह वाणिज्य बँकांच्या उच्च व्याजदरामुळे शहरांमधील मागणी कमी झाली आहे. त्यामुळे जूनअखेर संपलेल्या तिमाहीत देशातील सकल राष्ट्रीय उत्पादन, म्हणजेच जीडीपीची वाढ मंदावली आहे. ज्यावेळी रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करण्यास सुरुवात करेल, तेव्हा आर्थिक विकासास जोम प्राप्त होईल.

महागाई कमी करण्यासाठी जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून व्याजदरवाढ केली जात होती. परंतु आता अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने व्याजदरात अर्ध्या टक्क्यांची कपात केल्यामुळे, इतर देशांच्या मध्यवर्ती बँकांकडूनही व्याजदर कपातीला सुरुवात झाली आहे. मात्र कर्जावरील व्याजाचे दर घटवले, तर ठेवींवरील दरही घटवावे लागतील आणि सध्याच भारतातील ठेवींची परिस्थिती बिकट झाली आहे. म्हणूनच बँकांच्या ठेवींमधील वाढ मंदावल्यामुळे त्यांच्याकडून निधी उभारण्यासाठी रोखेविक्रीवर भर दिला जात आहे.

चालू आर्थिक वर्षात बँका रोख्यांच्या माध्यमातून 1.30 लाख कोटी रुपयांचा निधी उभारतील, असा अंदाज 'इक्रा'च्या ताज्या अहवालात मांडण्यात आला आहे. 'इक्रा' ही एक प्रतिष्ठित पतमानांकन संस्था आहे. बँकांना कर्ज देण्यासाठी प्रथम ठेवी आकर्षित करून घ्याव्या लागतात आणि जर पुरेशा ठेवी मिळत नसतील, तर निधी उभारणीचा अन्य मार्ग अवलंबावा लागतो. ठेवी आणि कर्ज यांच्या वाढीतील तफावत रुंदावत असल्यामुळे, बँकांकडून रोखेविक्रीच्या माध्यमातून भांडवल उभे केले जात आहे. चालू आर्थिक वर्षात बँका रोख्यांच्या माध्यमातून 1.2 लाख ते 1.3 लाख कोटी रुपयांचा निधी उभारतील, अशी चिन्हे आहेत. आतापर्यंतची ही विक्रमी निधी उभारणी असेल. यातील सुमारे 85 टक्के रोखेविक्री सार्वजनिक क्षेत्रातील बँका करतील. आज कर्जातील वाढ सातत्याने चढत जाऊन, ती ठेवीतील वाढीपेक्षा जास्त झाली आहे. यामुळे बँकांना निधीसाठी अन्य उपाय योजावे लागत आहेत. कर्जाची मागणी जास्त आहे. कारण व्यापार व उद्योगात तेजी आहे.

**अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांकडून व्याजदर कपात केली जात आहे. मात्र, कर्जावरील व्याजाचे दर घटवले, तर ठेवींवरील दरही घटवावे लागतील. पण भारतातील ठेवींची परिस्थिती बिकट झाली आहे.**

गेल्या आर्थिक वर्षात बँकांनी रोख्यांच्या माध्यमातून 1 लाख कोटी रुपयांची उभारणी केली होती. त्याआधी 2022-23 मध्ये बँकांनी 1.1 लाख कोटी रुपयांची निधी उभारणी रोख्यांमधून केली होती. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यांत बँकांनी रोख्यांच्या माध्यमातून 76 हजार 700 कोटी रुपये उभारले आहेत. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्यात 225 टक्के वाढ झाली असून, बँका आता प्रामुख्याने रोख्यांमधूनच निधी उभारत आहेत. परंतु रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारणी जास्त झाल्यामुळे, खासगी बँकांचे कर्ज-पत गुणोत्तर आणखी बिघडणार आहे. याचवेळी सार्वजनिक क्षेत्रातील बँका पायाभूत सुविधा रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारणी करत असून, त्यात आणखी वाढीला वाव आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या ठेवींमध्ये वाढ होण्यासाठी विशेष मोहीम राबवा, असे रास्त आवाहन मध्यंतरी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकप्रमुखांच्या बैठकीत केले होते. गेल्या काही महिन्यांत बँकांमधील ठेवीतील वाढीपेक्षा पतपुरवठ्यातील वाढ तब्बल तीन ते चार टक्क्यांनी अधिक राहिली असून, त्यामुळे बँकांचे मालमत्ता-दायित्व यांचे समीकरण बिघडलेले आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर, बँकांना व्याजदराच्या निर्धारणाबाबत स्वातंत्र्य देण्यात आले.

दिलेल्या स्वातंत्र्याचा वापर करून बँकांनी ठेवी अधिक आकर्षक केल्या पाहिजेत, अशी सूचना अर्थमंत्र्यांनी केली असून, बँकांच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी त्या दिशेने पावले टाकली पाहिजेत. राष्ट्रीयीकृत बँकांच्या देशात ठिकठिकाणी शाखा असतात. या विशाल जाळ्याचा लाभ घेऊन नवनवीन उत्पादने आणि सेवा देऊन ठेवींमध्ये वाढ करता येऊ शकते. चालू वर्षात बँकांच्या ठेवीवाढीचा वेग 10.6 टक्के होता, तर कर्ज वितरणातील वेग आधी 13.7 टक्के होता आणि नंतर तो 16 टक्क्यांवर गेला. शेवटी बँका गोरगरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना जी कर्जे देतात, ती ठेवींच्या रकमेतूनच देतात. उद्या या ठेवीच आटू लागल्या, तर कर्ज देणार कुठून?

ठेवी संकलनातील वाढीचा वेग कमी होत असल्याबद्दल अर्थमंत्र्यांप्रमाणेच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. शक्तिकांत दास हे सातत्याने चिंता व्यक्त करत असले, तरी स्टेट बँकेच्या अर्थतज्ज्ञांचे मत काहीसे वेगळे आहे. स्टेट बँकेच्या अहवालानुसार, बँकिंग व्यवस्थेतील एकूण मुदत ठेवींपैकी 47 टक्के ठेवी या ज्येष्ठ नागरिकांच्या आहेत. युवा वर्ग हा जास्त रिटर्न किंवा परतावा देणार्या गुंतवणुकीच्या अन्य साधनांकडे वळत आहे. ठेवींवरील कराचा पुनर्विचार केला गेल्यास, बँकांमधील ठेवी वाढण्यास मदत होईल.

बँकांकडे पुरेशा ठेवीच नसतील, तर सर्व ग्राहकांच्या कर्जविषयक मागण्या पूर्ण करणे बँकांना शक्य होणार नाही. म्हणूनच बँकांनी ठेवीचे व्याजदर काही प्रमाणात वाढवले पाहिजेत. सध्या महागाई वाढत असून, बचत खात्यात पैसे ठेवल्यास तीन-साडेतीन टक्के, तर मुदत ठेवींवर त्यापेक्षा दोन-तीन टक्के जास्त मिळतात. ज्येष्ठ व अति ज्येष्ठ नागरिक असल्यास, अर्धा ते एक टक्का जास्त व्याज मिळते. परंतु दैनंदिन वाढता खर्च पाहता, सहा ते आठ टक्के व्याज बँकात मिळत असेल, तर तो आतबट्ट्याचाच व्यवहार होतो. म्हणूनच सर्वसामान्य गुंतवणूकदार हा म्युच्युअल फंडांच्या एसआयपी योजना किंवा थेट शेअर बाजार याकडे वळत आहे. या गुंतवणुकीतून 15 ते 25 टक्के या दरम्यान रिटर्न मिळू शकतो.

थेट शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास, त्यात जोखीमही असते. सामान्यतः 'शेअर बाजार नको रे बाबा' असे म्हणणारे लोक हे बँकांमध्ये ठेवी ठेवतात. अनेकांचे उत्पन्न कमी आणि मर्यादित असल्यामुळे ते आपली मर्मबंधातील ठेव सुरक्षित आहे ना, मग झाले, अशा विचारातून निर्णय घेतात. अशा लोकांचा विचार करून बँकांमधील ठेवींचे दर अधिक आकर्षक ठेवले, तर ते योग्य होईल.

## उघड्या चेंबर मध्ये पडल्याने नागरिक गंभीर जखमी

भिवंडी : महापालिका हद्दीतील नाल्यांवरील उघड्या चेंबरमध्ये पडल्याने एक इसम गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी भारत कंपाऊंड मध्ये घडली आहे.कायम अली उर्फ जॉन असे उघड्या चेंबर मध्ये पडलेल्या व्यक्तीचे नाव असून ते शुक्रवारी दुपारी कल्याण रोड गैबी नगर रस्त्या वरील भारत कंपाऊंड येथे असलेल्या नाल्या वरून दुचाकी ने जात होते.यावेळी नाल्यावर अनेक चेंबर उघडे असल्याचा अंदाज न आल्याने त्यांची दुचाकीसह उघड्या चेंबर मधून गटारात पडली. परिसरातील नागरिकांनी त्यांना गटारातून बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या डोक्याला मोठी जखम झाली असून सुदैवाने माझा जीव वाचला मात्र मनपा प्रशासनाने शहरासह भारत कंपाऊंड येथील नाल्यांवरील चेंबर त्वरित टाकून दुरुस्ती करावी अशी मागणी जखमी जॉन यांनी केली आहे.

## अंबरनाथ येथील जिंन्स कारखान्यावर कारवाई करा आर पी आय ची मागणी

अंबरनाथ : अंबरनाथ पुर्वेला जिन्स वॉशिंग चे कारखाने बिनधास्तपणे सुरु आहेत. या कारखान्याचे दुषीत पाणी वालधुनी नदीत सोडण्यात येत असल्याने नदीचे पाणी दुषीत झाल्याने मुक्या जनावराना यांचा धोका असुन नदी काठावर राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास सुध्दा धोका निर्माण झाला आहे. तेव्हा या अनधिकृत जिन्स कारखान्यावर कारवाई करा, अशी मागणी आर पी आय चे ( आठवले ) अंबरनाथ शहर अध्यक्ष दिपक धनावडे यांनी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

अंबरनाथ पुर्वेला असलेल्या एम आय डी सी जवळील वैभव हॉटेल परिसरात अनधिकृतपणे जिन्स वॉशचे कारखाने सुरु आहेत. या कारखान्यामध्ये जिन्सच्या कापडावर रासायनिक प्रक्रिया करुन त्या कापडाला वॉश करण्यात येते. तेव्हा जिन्स वॉश केलेले पाणी हे कारखानदार वालधुनी नदीत सोडतात. त्यामुळे वालधुनी नदी प्रदुषीत होत आहे. दरम्यान याच नदीतील पाणी जनावरे पिले तर त्यांच्या जिवाला धोका असुन वालधुनी नदीकाठावर राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला सुध्दा धोका निर्माण होणार आहे. सोबतच केमिकल कंपन्यावाले सुध्दा या नदीत दुषीत केमिकल सोडत असल्याने नागरिकाना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

### हिंगणघाट विधानसभेत तुतारी पर्वाची सुरुवात....

# सिंदी रेल्वे विभागातील हजारो नागरिकांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश

हिंगणघाट :- सिंदी रेल्वे विभागातील हजारो नागरिकांनी हिंगणघाट येथे भव्य रॅली काढत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात पक्ष प्रवेश केला .

सिंदी रेल्वे येथून पन्नास गाड्यांच्या ताफ्याने पक्षप्रवेश करण्यासाठी सिंदी रेल्वे कर हिंगणघाट शहरात दाखल होते..कार्यकर्त्यांच्या उत्साहात झालेल्या या अनोख्या पक्षप्रवेशाची हिंगणघाट शहरात व सिंदी रेल्वे शहरात जोरदार चर्चा.ढोल ताशाच्या गजरात हिंगणघाट शहरात रॅली काढून अतुल वांदिले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हजारोंच्या संखेने हा पक्षप्रवेश झाला।

जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या उपस्थितीत स्थानिक महावीर भवन येथे संपन्न झाला.

राष्ट्रवादीचे पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू इच्छित असणारे सिंदी रेल्वे विभागातील हजारो नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सहभागी झाले. हा भव्य पक्षप्रवेश सोहळा महावीर भवन हिंगणघाट येथे झाला.




आमच्यासोबत इतके लोक जोडले जात आहेत, यामुळे आम्हाला पक्षाचे काम अधिक जोमाने करण्यासाठी ऊर्जा मिळत आहे. असे मनोगत प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी व्यक्त केले. या वेळी उपस्थित लोकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. येत्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मतदारांसमोर एक चांगला पर्याय उपलब्ध असेल. असे मनोगत जिल्हाध्यक्ष तुम्ही राऊत यांनी व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले,तालुका अध्यक्ष महेश झोटिंग पाटील, माजी नगराध्यक्ष बबनराव हिंगणेकर, सहकार नेते वासुदेव गौळकार,माजी उपाध्यक्ष सुधाकर खेडकर,सिंदी शहराध्यक्ष गंगाधर कलोडे, जिल्हा उपाध्यक्ष अशोक वांदिले,प्रदेश सचिव प्रशांत लोणकर, प्रदेश सरचिटणीस मोहम्मद अली अजानी,राजू तळवेकर,ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रशांत घवघवे, युवक शहराध्यक्ष तुषार हिंगणेकर, जिल्हा प्रचार प्रमुख संतोष तिमांडे,वाहतूक जिल्हाध्यक्ष शेखर जाधव, अपंग सेल जिल्हाध्यक्ष मारोती महाकाळकर, हिंगणघाट शहराध्यक्ष बालु वानखेडे, विधानसभा अध्यक्ष जावेद मिर्झा,सरपंच मनोज तिमांडे, सरपंच प्रवीण जायदे,फिरोज बेरा, प्रभाकर कलोडे,प्रवीण पाटील,भारत रोकडे,दिनेश घोडमारे,बबलू खान, श्रीकांत भगत, सुनील शेंडे, वसंता सिरसे,माजी नगरसेवक सुमनताई पाटील, माजी नगरसेवक राम अवतार तुरक्याल,बंटी बेळखोडे,गुडु कुरेशी, जगदीश बोरकर, युगल अवचट,अतुल काळबांडे,सूरज वाघमारे,समीर वाघमारे, शुभम वाघमारे,सागर सोनटक्के, विष्णु वाघमारे, रवी राणा, सचिन पेटकर, हर्षल मोरस्कर महिला सीमा मेश्राम, सुजाता जांभुळकर, शीतल तिवारी, मिना सोनटक्के, रुपाली झाडे, विद्या गिरी, नालंदा राऊत,दिपाली रंगारी यांच्यासह हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौध्द महासभा सुभाष नगर अध्यक्षपदी अशोक शिरसाट

उल्हासनगर (प्रतिनीधी): भारतीय बौध्द महासभा, राष्ट्रीय संरक्षक महाउपासिका मीराताई आंबेडकर, ट्रस्ट चेअरमन डॉ हरीष रावलिया, राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर, यांच्या आदेशानुसार भारतीय बौध्द महासभेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड गुरुजी, सरचिटणीस प्रभाकर सुर्यवंशी सर, संघटक छगन सुरवाडे गुरुजी, यांच्या मार्गदर्शनाखाली , उल्हासनगर - ३ मध्ये सुभाष नगर शाखा पंचशील बुध्द विहारात शुक्रवार दि, २७ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय बौध्द महासभा सुभाष नगर शाखेच्यावतीने नवीन कार्यकारणीची बैठक आयोजन करण्यात आली होती तसेच उल्हासनगर तालुका अध्यक्ष रोशन पगारे, सरचिटणीस लक्ष्मण मोरे, कोषाध्यक्ष जीवन मोरे, उपाध्यक्ष देविदास



कांबळे, सचिव सोमाजी खैरनार, भास्कर सरोदे, दिलीप शिंदे, तांबे , रमेश वानखेडे, उल्हासनगर तालुका महिला अध्यक्षा कल्पनाताई वानखेडे, यांच्या उपस्थितीत सुभाष नगर शाखेची नवीन कार्यकारणी निवड करण्यात आली तसेच भारतीय बौध्द महासभा सुभाष नगर शाखेचे नवीन अध्यक्ष अशोक एफ शिरसाट, सरचिटणीस परसराम ओंकार, कोषाध्यक्ष बेबीताई थोरात, संस्कार उपाध्यक्ष प्रमोद राजगुरू, संस्कार सचिव सुनिताताई कांबळे , पर्यटन सचिव शशिकांत आढांगळे संरक्षण सचिव छायाताई म्हस्के, कार्यलयानीस सचिव शरद जाधव, हिशोब तपासणीस प्रकाश कांबळे, यांच्यासह आदी कार्यकर्ते यांची निवड करण्यात आली होती तसेच या निवड बैठकीत माजी अध्यक्ष एफ ए शिरसाट, यांच्यासह उपासिका, उपासक, यावेळी उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्हासनगर तालुका शाखेचे सरचिटणीस लक्ष्मण मोरे यांनी केले.

## लोअर परळच्या 520 कोटींची नवीन कार पार्किंग मध्ये 300 कोटीचे नुकसान

मुंबई, :- एलेव्हेटेड मल्टीलेव्हल इलेक्ट्रोमेकॅनिकल कार पार्किंग सिस्टीम (शटल आणि रोबो पार्कर सिस्टीम) माटुंगा, मुंबादेवी, फोर्ट आणि वरळी अंतर्गत यापूर्वी झालेले नुकसान लक्षात न घेता पुन्हा जी दक्षिण लोअर परळ येथील Asphalt प्लांट येथे 548 कार पार्किगचे 520 कोटींचे जारी केलेली निविदा रद्द करत कंत्राटदार आणि अधिकारी यांचे संगनमत लक्षात घेता कारवाई करण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी केली आहे. 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग असणार आहे. आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालिका आयुक्त भूषण गगराणी यांस पाठविलेल्या पत्रात उल्लेख केला आहे की यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेत अधिकारी वर्गाने जी दक्षिण लोअर परळ येथील Asphalt प्लांट येथे 548 कार पार्किगचे 520 कोटींचे नवीन निविदा जारी केल्या आहेत. प्रत्येक कार मागे 95 लाख खर्च येत आहे. यामुळे या निविदेत 300 कोटींचे नुकसान होईल. या निविदेतही मूळ उपकरणे उत्पादन भागीदार सर्व निविदाकारात एकच म्हणजे मेसर्स सोटेफिन पार्किंग प्रायव्हेट लिमिटेड असेल यात काडीमात्राची शंका नसेल.यापूर्वी पालिकेने कार्यादेश दिले आहेत त्यात माटुंगा, फ्लोरा फाउंटन आणि वरळी याचा समावेश आहे. फ्लोरा फाउंटन ( विशाल कंन्स्ट्रॅकशन ) येथे 70 कोटीत 176 कार पार्किगचे देण्यात आले आहे. प्रति कार हा खर्च 39.77 लाख आहे.

वरळी ( श्री इंटरप्रायझेस ) येथे 640 कार पार्किगचे काम 216.94 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 33.90 लाख आहे तर माटुंगा ( रेलकोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट ) येथे 475 कार पार्किगचे काम 103.87 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 21.87 लाख आहे. त्याचशिवाय एमएमआरडीएच्या मालवणी येथे 669 कार पार्किगचे काम 150 कोटीत देण्यात आले असून तेथे हा खर्च प्रति कार 22.42 लाख इतका आहे. अनिल गलगली यांच्या मते निविदा जारी करताना अधिकारी यांनी किंमतीचे मूल्यमापन योग्य रीतीने केले गेले नाही कारण दरांचे कोणतेही विश्लेषण केले गेले नाही किंवा विभागाने संपूर्ण भारतभर राबविण्यात येणारे इतर तत्सम प्रकल्प किंमत मूल्यांकनासाठी संदर्भ बिंदू म्हणून घेतलेले नाहीत.

## रमेशकुमार सिंह यांना आठव्यांदा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

मुंबई,:- शिक्षणाशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आपल्या सर्वांना ज्ञानाच्या माळा घालणाऱ्या शिक्षकाचे आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. असे शिक्षक जे समाजासाठी आदर्श आधारस्तंभ ठरतात. त्यापैकी एक म्हणजे रमेशकुमार सिंह हे असून सलग आठव्यांदा त्यांना आदर्श शिक्षक या पदवीने गौरविण्यात आले आहे. रमेश कुमार सिंह हे आदर्श नाईट हिंदी हायस्कूल मुलुंड, सेंट उलई हिंदी स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय ठाणे येथील विद्यार्थ्यांना हिंदी, मराठी आणि समाजशास्त्राचे शिक्षण देत आहेत. आदर्श नाईट हिंदी हायस्कूल, मुलुंड गेल्या तीन वर्षांपासून उत्कृष्ट निकाल मिळत आहे. आदर्श नाईट स्कूल आणि रमेश सिंह यांच्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून पुरस्कारांची ही सलग हॅट्रिक आहे. रमेशकुमार सिंह यांना 27 वर्षांत आठव्यांदा सर्वोत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. लायन्स




क्लबच्या वतीने आयोजित समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या विशेष कामगिरीबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांसह सर्व स्तरातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## गणेशपुरीत स्टेरिंग नादरुस्त झाल्याने एसटी बस ला अपघात सात जण जखमी

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी या तीर्थक्षेत्र मध्ये छत्रपती शिवाजी चौक ते गणेशपुरी या अरुंद रस्ता वरून गणेशपुरी येथे जाणाऱ्या एसटी बस चे स्टेरिंग नादरुस्त झाल्याने गणेशपुरी येथील रस्त्यात असलेल्या एका झाडाला अदळून झालेल्या अपघातात सात जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

वसई आगार ची वसई जव्हार बस क्रमांक एम च 14बी टी 2383 वसई हुन गणेशपुरी जात असताना अचानक स्टेरिंग फेल झाल्या मुळे व त्यातच शिवाजी चौक ते गणेशपुरी हा रस्ता वाढत्या अतिक्रमण मुळे अरुंद झाला असल्याने चालकाचे एसटी वरील नियंत्रण सुटल्या मुळे ने सुदैवाने अचानक रस्त्या लगत असलेल्या एका झाडावर आदळलीत्यात एसटी चे मोठे नुकसान झाले असून एस टी तील सात प्रवाशांना दुःखपत झाली असून जीवित हानी टळली. अलीकडे सर्वत्र अतिक्रमण सुरु आहे गणेशपुरी चौकात मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली गेली आहेत व त्याच ठिकाणी शाळेचे विदयार्थी शाळा सुटल्यावर मोठ्या प्रमाणात उभे असतात, सुदैवाने या ठिकाणी एसटी ब्रेक नादरुस्त झाले असते तर विद्यार्थना मोठा अपघात झाला असता अशीपरिसरात सर्वत्र चर्चा सुरु आहे, या बाबत गणेशपुरी पोलीस ठाणे येथे व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी अपघाताची नोद घेतली आहे. दरम्यान अंबाडी नाका येथे खोदकाम करून बांधकामं केली आहेत अशा अतिक्रमणा मुळेच परिसरात मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत मात्र या कडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने मोठी नाराजी व्यक्त होत आहे.



## पंढरपूर मध्ये दिवाळीची खरेदी एकाच छताखाली आयोजन

### दिवाळीनिमित्त मनसे आणि वीरशैव महिला मंडळ यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम जाहीर

पंढरपूर, :- महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळ पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिला उद्योजकांसाठी पंढरपूर मध्ये भव्य असा एक्सपो घेऊन दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक १९,२० ऑक्टोबर २०२४ रोजी भरवण्यात आला आहे. यामध्ये भाग घेणाऱ्या महिला उद्योजकांसाठी मोफत स्टॉल व स्टॉल उभारण्यासाठी विना व्याज कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी स्टॉलची बुकिंग करावी असे आवाहन मनसे नेते दिलीपबापू धोत्रे आणि डॉक्टर शोभा कराळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे.

यावेळी मनसेचे पदाधिकारी व आद्य वीरशैव महिला मंडळाचे अध्यक्ष डॉ. सौ.शोभा कराळे, सौ.सुवर्णा स्वामी, सौ.आरती पावले, सौ.कविता पावले, सौ. विशालाक्षी पावले, सौ.संजीवनी ठीगळे, सौ.मनीषा वासकर, सौ.अनुराधा स्वामी उपस्थित होत्या.

पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा. नागरिकांना दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळाच्या वतीने पंढरपुरात प्रथमच दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता येणार आहे. या एक्सपो मध्ये २०० स्टॉल उभारण्यात येणार असून यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाम मात्र नोंदणी फी १०१ ठेवण्यात आली आहे. भाग घेणाऱ्या महिला भगिनींना मोफत सुसज्ज स्टॉल दिले जाणार आहेत.

## आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याचा बंधारा भूमिपूजन प्रसंगी आमदार समीर कुणावार यांचे भावनिक उदगार


हिंगणघाटः आज नगरपालिका हिंगणघाट प्रांगणात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरात्थान महाअभियानांतर्गत हिंगणघाट पाणीपुरवठा योजनेकरीता वणा नदीवर ४७कोटी ३० लक्ष रूपये किंमतीचा बंधारा बांधकामांचे भूमिपूजन आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते तथा माजी नगराध्यक्ष प्रेमबाबू बंसतानी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार कुणावार यांनी बंधारा कश्या पद्धतीने मंजूर करून आणला याबाबत माहिती उपस्थितांना दिली हिंगणघाट येथील बंधारा मंजूर करून आणणे हि काय सोपी बाब नव्हती या बंधारासाठी सुमारे १५ वर्षा आधी ५ कोटी रुपये मंजूर झाले होते मात्र तत्कालीन नगरपरिषद नगर परिषद प्रशासनाच्या काळात बंधारा बांधकामांची गुणवत्ता कायम राखता न आल्याने तो बंधारा निकृष्ट दर्जाचा ठरला व वाहून गेला त्यामुळे एकाच कामांकरिता परत निधी प्राप्त करणे हि बाब अत्यंत कठीण होती परंतु आमदार कुणावार यांनी मागील दहा वर्षांपासून सातत्याने या बंधारासाठी निधी मिळावा म्हणून पाठपुरावा करत वेळोवेळी संसदीय आयुधांचा वापर करत शासनाला सदर बंधाऱ्याच्या कामाबाबत लक्ष वेधतं शासनाकडून निधी प्राप्त करून घेतला आज त्या कामांचे भूमिपूजन करताना अतिशय समाधान होत असून आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहण्यांचा असल्याचे भावनिक उदगार काढले .

माझ्या हिंगणघाटकर जनतेला दिलेल्या शब्दांच्या पुर्तेते करीता एक पाऊल पुढे टाकले असून लवकरच सदर बंधाऱ्याचे बांधकाम पुर्ण झाल्यावर चोवीस तास पाणीपुरवठा करण्याचे स्वप्न पूर्णत्वास येणार असल्याची भावना व्यक्त केली यावेळी माजी नगराध्यक्ष प्रेमबाबू बंसतानी,माजी न.प.उपाध्यक्ष चंदूभाऊ मावळे,किरणजी वैद्य, श्रीमती प्राजंली टोंगसे, मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे माजी नगरसेवक नगरसेविका व शहरातील प्रतिष्ठित नागरिक नपा अधिकारी व कर्मचारी, पत्रकार बंधू उपस्थित होते.

## 10 हजार लाडक्या बहिणींना भाजपा अल्पसंख्याक मोर्चातर्फे साड्या आणि सूट वाटप कार्यक्रम

### देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार

मुंबई, :- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पखवाडा अंतर्गत भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष एस.एम.खान यांच्या मार्फत शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ओशिवरा मेट्रो स्थानकाजवळील म्हाडा मैदानावर आयोजित कार्यक्रमात १० हजार महिलांना मोफत साड्या आणि सूटचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता ताई फडणवीस आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष ॲड आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, स्थानिक आमदार भारती ताई लवेकर,



अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र अध्यक्ष इद्रेश मुलतानी, भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ, महाराष्ट्राचे माजी गृह राज्यमंत्री कृपाशंकर सिंह, महाराष्ट्र उपाध्यक्ष एजाज देशमुख, अल्पसंख्याक मोर्चाचे मुंबई अध्यक्ष वसीम खान या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. एसएम खान यांनी त्यांच्या जोगेश्वरी पश्चिम कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

## चांदिवलीत भाजपच्या सेवापखवाडा अंतर्गत रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन

मुंबई,:- देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष आवाहनानुसार सेवा पखवाडा अंतर्गत भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठान आणि अहिमसा विश्व भारती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चांदिवली भाजप मंडळ आणि मुंबई अल्पसंख्यांक मोर्चाच्या विशेष सहकार्याने साकीनाका येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या विश्व भारती अहिमसेचे संस्थापक रक्तदान, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यात समर्पित असलेले आचार्य डॉ. लोकेश मुनीजी महाराज, राज्यसभा खासदार, चंडीगढ विद्यापीठाचे कुलपती आणि भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतनाम सिंह संधू, मुंबई भाजपचे महासचिव आणि महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री संजय उपाध्याय, चांदिवलीचे कार्यतत्पर आमदार दिलीप मामा लांडे, सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली, मुंबई भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वसीम आर खान,




चांदिवली मंडळाचे अध्यक्ष प्रकाश देवजी मोरे, उत्तर मध्य मुंबई जिल्हाचे उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, माजी नगरसेवक सीताराम तिवारी, प्रभाग अध्यक्ष प्रशांत मौर्य, महेश चौगुले, युवा मोर्चाचे मंडल अध्यक्ष अभिषेक सिंह, अमेय दोंदे, उत्तर पश्चिम जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष हुसेन खान. पठाण, अग्नेलो फर्नांडिस, अल्ताफ खान, इम्रान खान, जेपी शेट्टी, मंदा ताई राठौर, साधना शर्मा, सुरेंद्र यादव, भावेश भानुशाली, आदिल खान, हितेश जैन, खाबरा, रेश्मा चौघुले, प्राजक्ता साने, रंजना राणे दास, वीरेंद्र दुबे, गायकवाड, सुभेदार यादव, नितीन कांबळे, परशुराम शिंदे, संजय यादव, स्वप्नील पवनकर, राधेश्याम यादव, अजय शेलार, सामाजिक कार्यकर्ते संपत अण्णा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरामध्ये भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश मोरे यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

## थोडक्यात

### संसदेच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण समिती सदस्यपदी सुरेश म्हात्रे यांची नियुक्ती

कल्याण : संसदेच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण समितीच्या सदस्य पदी भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाल्या मामा) म्हात्रे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. संसदेच्या वतीने दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून आरोग्य आणि कुटुंब कल्याण समितीच्या सदस्यपदी खासदार सुरेश म्हात्रे याची नियुक्ती करण्यात आली आहे. म्हात्रे यांनी नियुक्ती जाहीर झाल्याने भिवंडी लोकसभेत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून सर्वच स्तरातून खासदार सुरेश( बाल्या मामा म्हात्रे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. भिवंडी लोकसभेत नागरिकांना आवश्यक त्या आरोग्य व वैद्यकीय सुविधा देण्यासाठी आपण नेहसमीच प्रायत्नशील असून आता संसदेच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण समितीच्या सदस्य पदी नियुक्ती झाल्याने सर्वप्रथम येथील नागरिकांना आवश्यक आणि योग्य त्या सेवा सुविधा पुरसवण्यासाठी आपण आवश्यक ते प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया खासदार सुरेश (बाल्या मामा) म्हात्रे यांनी दिली आहे.

### येत्या मंगळवारी १ ऑक्टोबर रोजी होणार कल्याण पश्चिमेत पाणी बंद

कल्याण : येत्या मंगळवारी १ ऑक्टोबर २०२४ रोजी कल्याण पूर्व - पश्चिमेचा पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे देण्यात आली आहे. बारावे जलशुद्धकरण केंद्राला वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणच्या सबस्टेशनमधील फिडर मध्ये केल्या जाणाऱ्या देखभाल दुरुस्ती कामामुळे कल्याणाचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. बारावे जलशुद्धिकरण केंद्रातील फिडरच्या कामासाठी मंगळवारी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत महावितरणतर्फे शटडाऊन घेण्यात येणार आहे. परिणामी कल्याण पूर्व आणि पश्चिमेचा पाणी पुरवठा सकाळी १० ते सायंकाळी ४ असा ६ तास बंद राहणार असल्याची माहिती केडीएमसीच्या यांत्रिक विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली आहे.

# अखेर भंडार्लीतील ८० वर्षीय वृद्धेचे प्रशासनाच्या मध्यस्थीने उपोषण मागे

### भूमिपुत्रांच्या मागण्या येत्या आठ दिवसात पूर्ण करण्याचे आश्वासन

ठाणे : भंडारली तसेच गोठेघर येथे सन 2019 मध्ये गावाच्या विकासासाठी शाळेचा आरक्षित भूखंडावर तसेच विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कट कारस्थान रचून हटविण्यात येऊन त्या ठिकाणी शिर्के बिल्डर याने अनधिकृत इमारती बांधल्या होत्या. शासनाचा स्पष्ट आदेश असताना ही आरक्षित भूखंड सोडून बांधकाम कारावे पण शिर्के बिल्डरने काही राजकीय व इतर लोकांच्या मदतीने आरक्षित भूखंडावर इमारती बांधल्या परंतु सक्षम प्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याने ते सर्व बांधकाम अनधिकृत ठरत असताना याबाबत अनेक वेळा पत्र व्यवहार केल्याचा राग मनात धरून सुंदराबाई गोवर्धन पाटील यांच्या कब्जे




वहीवाटीच्या तसेच 7/12 असलेल्या मालकी हक्काची घरे शिर्के बिल्डर यांनी दंडेलशाही वापरून दिनांक 6/6/2024 रोजी तोडली त्यांचा शेतातून जाणारा रस्ता बंद केला. याबाबतही निवेदन देवून ही कार्यवाही होत नव्हती.

गावाच्या विकासासाठी तसेच भूमिपुत्रांच्या न्याय हकासाठी सुंदराबाई गोवर्धन पाटील वय 80 वर्ष यांनी दिनांक 26 /09/2024 रोजी पासून भंडार्ली येथे आमरण उपोषण सुरू होते. गावाच्या विकासाच्या आरक्षित जागाच राहिल्या नाहीत तर विकास कसा होणार ? आरक्षित भूखंडावर, गुरुचरण जागा, शासनाच्या जागा असतील तर त्यावर गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायत, ग्रामसेवक यांनी ठराव घेवून तहसीलदार यांना पाठवून तो मंजूर करून घेणे आवश्यक आहे असे मत धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अमोल धनराज केंद्रे यांनी उपोषण दरम्यान मांडून उपोषणास जाहीर पाठिंबा दिला होता. तहसीलदार यांच्या सोबत पहिल्याच दिवशी शिष्टमंडळ सह सकारात्मक चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी दिनांक 27/09/2024 रोजी वृद्ध महिलेची प्रकृती बिघडल्याने समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक डायघर पोलिस ठाणे यांच्या शी चर्चा झाल्यानंतर त्यांनी स्वतः तहसीलदार यांना कळवून याबाबत सहकार्य करण्याचे सांगितले. तसेच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे सचिव कैलाश सुरवाडे, शिवसेना उप जिल्हाप्रमुख शरद भाईर, धडाकेबाज युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल केंद्रे, राजन गायकवाड , तसेच इतर प्रतिष्ठित नागरिकांनी तहसीलदार यांच्या सोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी त्यांच्या वतीने तलाठी यांना तेथे पाठवून विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ज्या ठिकाणी होता तिथे बसवण्यात येईल तसेच शेत रस्ते तात्काळ रिकामे करून दिले जातील तसेच इतर मागण्या बाबत तहसीलदार साहेबांनी 8 दिवसात कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले.

## आदिवासी पारधी समाजाच्या मानखुर्दमधील वसाहतीत स्वच्छता मोहीम

### सोलापूर येथील शासकीय अधिकाऱ्यांची पाहणी

मुंबई, : - मुंबईतील मानखुर्द येथील पारधी वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सोलापूर येथून उपस्थित झालेले प्रशासकीय अधिकारी झाकडे , सरतापे यांनी भेट देऊन मुंबईतील पारधी वसाहतीचा समस्यांचा आढावा घेतला. यावेळी आदिवासी पारधी महासंघाचे मुंबई ,नवी मुंबई अध्यक्ष व काँग्रेस पक्षाचे पारधी समाज महाराष्ट्र सेल अध्यक्ष संतोष एकनाथ पवार यांनी उपस्थित पारधी समाजाला मार्गदर्शन करताना मोलाचा सल्ला दिला.

आदिवासी पारधी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब साळुंखे यांच्या निवासस्थानी भेट देऊन सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले पाहिजे, अशी मागणी यावेळी संतोष पवार यांनी लावून धरली. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यानी पारधी समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देऊन हे प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी आदिवासी पारधी मुंबई, नवी मुंबई, ठाणे ,रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. त्यावेळी नवी मुंबईतील केरला भवन समोरील आदिवासी पारधी वसाहतीच्या पुनर्वसन बाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. आदिवासी पारधी समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात प्रशासकीय पातळीवर योग्य ते निर्णय घेण्याचे ठराव पारित करण्यात आले. यावेळी भीषण काळे, सोमनाथ पवार, शहाजी पवार, लक्ष्मण काळे आदी आदिवासी पारधी समाजातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यादरम्यान उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आदिवासी पारधी महासंघाचे मुंबई अध्यक्ष संतोष पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## दिवा स्टेशन पुर्व परिसरातील वाहतूक कोंडी सुटणार



ठाणे : दिवा रेल्वे स्थानक पुर्व ते दिवा चौक परिसरातील वाहतूक कोंडीमुळे दिवेकरांसह वाहनचालक मेटकुटिला आले आहेत त्यात फेरीवाले व बेशिस्त रिक्षा चालक रिक्षा कोठेही उभी करतात त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा फटका हा रेल्वे फाटकाला देखील पडत असून त्यामुळे रेल्वे सेवा देखील कधी कधी बाधित होत आहे.


शिवसेना दिवा शहराच्या मागणी नंतर आज दिवा स्टेशन परिसरातील होणारी वाहतूक कोंडी, रिक्षा स्टँडची जागा स्टेशन परिसरातील फेरीवाला याचा आढावा घेण्यासाठी ठाणे महानगरपालिकेचे सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्यासह संबंधित विभागीय अधिकारी, अभियंते, ठाणे वाहतूक विभागाचे वपोनि खराडे तसेच शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी, उपशहर प्रमुख शैलेश पाटील, मा. नगरसेवक अमर पाटील, दिपक जाधव तसेच आदेश भगत, उमेश भगत, चरणदास म्हात्रे यांच्यासह दिवा शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दिवा स्थानक पुर्व ते दिवा चौक १५० मीटर वर फेरीवाला हटविणे, रिक्षा स्टॅण्ड जागा बदलने, रस्त्याच्या समांतर दोन्हीही बाजूने नवीन गटार तसेच दिवा चौकातील चंद्रागण इमारती समोर नवीन गटर बांधणे यावर सकारात्मक निर्णय झाला असल्याचे दिवा शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले आहे.




ठाणे : दिव्यातील गॉड गिफ्ट फाऊंडेशन ट्रस्टचे दिवा-दातीवली येथील न्यू गुरुकुल कॉन्व्हेंट स्कूल, या शाळेत इयत्ता सिनियर केजी ते ते पाचवी विद्यार्थ्यांसाठी देवांशी हॉस्पीटलच्या सहकार्याने आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रसंगी शाळेच्या राणी जाधव, भाविका टीचर, रेबिका, तेजल, वृषाली सुस्मिता, मोहिनी टीचर व शेखर सर तसेच मुख्याध्यापकांसह शाळेचे संचालक श्री प्रेमनाथ म्हात्रे उपस्थित होते.

## महाशब्दसमाचार २३३



### आडवे संकेत

१) ............ राधिके जरा जपून जा तुझ्या घरी... या भावगीतातील सुरुवातीची ओळ
११) वगळलेले, टाकून दिलेले
१२) जिव्हामूलावर लोंबणारा मांसपिंड
१३) चिखलात उमलणारे एक सुंदर फूल
१४) राजबिंडा, सुकुमार व सुंदर
१५) वेगवेगळ्या रक्तगटाचे रक्त संग्रही ठेवून ते गरजूंना पुरवठा करणारी संस्था
१७) बनावटी, कृत्रिम
१८) सेवक, दास
१९) एक लाख ही संख्या
२१) देवाच्या नामस्मरणार्थ टाळ मृदूंगाच्या गजरात म्हणण्यात येणारी भक्तिगीते
२३) तरुण, जवान
२७) याप्रमाणे
२९) ओरबाडून काढणे
३१) मंत्राची वारंवारिता, देवाचे सतत केलेले नामस्मरण,
३२) नवऱ्याची दुसरी बायको
३४) डोक्याचे हाड
३५) एक विदेशी मद्यप्रकार
३६) रस्त्याच्या बाजूचे घाण पाणी वाहून नेणारी मोरी, नाली
३७) अग्निचा कण
३८) फिकीर, पर्वा
४०) यत्न, मेहनत
४१) उजाड, उदास
४२) दुर्घटना, आकस्मिक कारणांनी होणारी हानी
४३) कार्य
४४) मृतदेह पुरल्या ठिकाणी केलेले बांधकाम
४७) प्रत्यक्ष घटनेच्या जागी उपस्थित असलेल्यांनी दिलेली जबानी
४८) आदरपूर्वक
४९) मृत, मेलेला, दिवंगत
५१) प्रगट होणे, अवतार घेणे
५३) पौराणिक कालीन एक शस्त्र
५४) किडकिडीत, रोडका, दुर्बळ
५६) डोक्याशिवाय असलेले शीर
५७) लालसा, तीव्र इच्छा
५८) ईश्वर
५९) दूर करणे, परिहार
६०) मन रमण्याजोगे, सुंदर
६१) सामाजिक कार्यास्तव आपल्याजवळ असलेल्या अतिरिक्त जमिनीचे दान करणे
६२) घ्राणेंद्रिय
६३) कष्ट, परिश्रम
६५) ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू
६६) भारताचा एक शेजारी देश
६७) पाठ करणे, मुखोद्गत
६९) पंकज
७०) देवास अर्पण केलेला पशु
७१) गुलाम, अखंड व सबंध नाणे
७३) जखमेतून स्त्रवणारा घाणेरडा द्रव
७४) मस्तक, कपाळ
७५) वधुवरांची मिरवणूक
७६) सारखे
७८) गरीब, दुबळा
७९) लाकूड
८०) रथ, वाहन, गाडा
८१) महिन्याभर केलेल्या कामाचा महिन्याकाठी मिळणारा मोबदला, वेतन
८२) कैलासवासीचे संक्षिप्त रूप

### उभे संकेत

१) आपल्यालाच काही घेणे असल्यास हात न आखडता घ्यावे या अर्थाचा एक वाक्प्रचार
२) वजनी, भारी
३) नाजुक व सुरेख
४) ढोंगी, भोंदू
५) दीन, दरिद्री
६) जाणे, प्रस्थान
७) खिलाडू वृत्तीचा, आनंदी
८) दिमाख, डौल
९) समयसूचकता असलेला विचारल्याबरोबर पटकन उत्तर देणारा
१०) घाणेरडा, अस्वल
११) अंथरुणाची गुंडाळी
१६) सैल सोडणे, दिरंगाई
२०) ऱ्हास, उतरती कळा
२१) उणीव पूर्ण करणे
२२) गरज, आवश्यकता
२४) नदी नाल्यांवरील तकलादू पूल
२५) साठ मिनिटांचा अवधी
२६) पत्ता
२८) ठाव, थांग
२९) आपले मूल दुसऱ्याला देणे
३०) एक प्रकारची घोडागाडी
३३) तृण, गवत
३५) चापट, मऊ पदार्थाचा आघात
३९) हार, पराभव
४०) गिऱ्हाईक, ग्राहक
४२) अक्षत देऊन आमंत्रित करणे
४५) कोलकत्याचे एक जुने विमानतळ
४६) गाण्यास, प्रशंसा करण्यास योग्य
४७) प्रामाणिक व पतदार मनुष्य
४८) एक उत्कृष्ट प्रतीचे लाकूड
५०) वेश्या (उर्दू)
५१) निराधार व निराश्रितांना आश्रय देणारी संस्था
५२) स्वर, नाद
५५) शंभर
५६) भूकंप
५९) रोग परीक्षा, किमान पक्षी
६१) देवास जागे करण्यासाठी पहाटे म्हणावयाची मंगलपदे
६२) गुन्हेगारांनी अटकविण्यासाठी पोलिसांनी रस्त्यावर केलेली मोर्चेबांधणी
६४) कपाळभर लावलेले कुंकू
६५) सह, संगत
६६) श्रीयुत, श्रीमंत
६८) खोकला, ढास
६९) तांब्या, घागर
७२) दान करण्याची शक्ति, ऐपत
७६) सख्खा, नातेवाईक
७७) चोप, ताडन ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दसमाचारचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | स | न्न | म | र | ण | ■ | ग्रा | म | पं | चा | य | त | ■ | रा | न |
| र | ■ | ■ | नो | ■ | ■ | हि | म | ■ | च | ळ | व | ळ | ■ | ज | र |
| क्ष | ण | प्र | भा | ■ | भा | ■ | से | व | क | ■ | ■ | त | र्ज | नी | ■ |
| ण | ■ | श | व | घ | र | ■ | व | ■ | न्या | स | ■ | ळा | ■ | ती | स |
| ■ | कु | स्ती | ■ | ■ | द | ण | क | ट | ■ | वा | व | ट | ळ | ■ | वा |
| उ | मा | ■ | स | म | स्त | ■ | ■ | र | ■ | ष्ण | ■ | ■ | ■ | मा | र |
| प | रि | भ्र | म | ण | ■ | अ | स | फ | ल | ■ | पा | लु | प | द | ■ |
| का | का | ■ | ■ | का | ल | वा | ■ | ल | ज्जा | हो | म | ■ | रा | क | ट |
| र | ■ | स | त्य | ■ | ह | स्त | क | ■ | ■ | त | र | बे | ज | ■ | का |
| ■ | द | मा | ■ | प | र | व | ड | ■ | अं | क | ■ | च | य | न | ■ |
| गि | र्या | रो | ह | ण | ■ | ■ | क | ल्प | त | रु | ■ | व | ■ | व | ज |
| ऱ्हा | ■ | प | त | ■ | फ | णा | ■ | ■ | र | ■ | भू | ■ | क | ल | म |
| ई | द | ■ | ब | ग | ळा | ■ | आ | र | पा | र | ■ | अ | ष्ट | ■ | द |
| क | ल | म | ल | णे | ■ | न | ट | ख | ट | ■ | पा | रा | ■ | अ | ग्नी |
| ■ | द | ल | ■ | श | र्य | त | ■ | र | ■ | सा | व | ज | ■ | ल | ■ |
| म | ल | म | ल | ■ | ■ | ■ | व | ख | र | ■ | ■ | क | ला | का | र |

uday munde - 8446302691

Printed, Published and Owned by Mr. SANTOSH GOVIND KOTHAWADE and Printed at The New Millennium Printers, printing press place 14 A Sitaram Mills Compound, B.R Boricha Marg, Lower Parel, Mumbai 400011 and Published at New Maneklal Estate, A/303 , New Avantika Chs, Sant N.M Road Ghatkopar (West) Mumbai – 400086 in MARATHI Language and DAILY periodicity Editor Mr SANTOSH GOVIND KOTHAWADE-98670 24624
■ RNI NO.MAHMAR/2007/21516